# कृषी विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, माळनाका रत्नागिरी ४१५ ६१२.
दूरध्वनी क्र.- ०२३५२-२२४६२७ ई मेल - adortn296@gmail.com / adortn@rediffmail.com

जा.क्र. रजिप/कृषी/कार्या-२/ २४४ /२०२३ दिनांक १०.०२.२०२३

वाचले :- १) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शक सूचना जा.क्र. विप्र-७/ डॉ.बाआंकृस्वायो/तां.मा.सु/ १९९४३ /२०२२ दिनांक ०२.०६.२०२२
२) महाडीबीटी पोर्टलवरील ऑनलाईन लॉटरीद्वारे निवडलेली लाभार्थी यादी.
३) जिल्हास्तरीय निवड समिती सभा दिनांक १०.१०.२०२२
४) या कार्यालयाचे तांत्रिक मंजूरी आदेश क्र. रजिप/ कृषी/ कार्या २/ २४० /२०२३ दिनांक ०९.०२.२०२३

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०२२ - २३ अंतर्गत नवीन सिंचन विहीरींना प्रशासकीय मंजूरी आदेश देणेबाबत...**

उपरोक्त वाचले क्र. ०१ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेच्या तांत्रिक मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेत आल्या आहेत. त्यास अनुसरुन उपरोक्त वाचले क्र. ०२ अन्वये प्राप्त झालेल्या खालील लाभार्थ्यांच्या यादीला उपरोक्त वाचले क्र. ०३ अन्वये जिल्हा निवड समितीने दिनांक १०.१०.२०२२ रोजी मान्यता दिली आहे. या लाभार्थ्यांच्या सिंचन विहीरींच्या अंदाजपत्रकांना उपरोक्त वाचले क्र. ०४ अन्वये तांत्रिक मंजूरी प्रदान करणेत आली आहे. त्यानुषंगाने खालील निवडयादीतील लाभार्थ्यांच्या सिंचन विहीरींच्या प्रत्येक अंदाजपत्रकाला या आदेशाद्वारे प्रशासकीय मंजूरी देणेत येत आहे.

| अ.क्र | तालुका | गाव | लाभार्थ्याचे नाव | तांत्रिक मंजूरीची रक्कम रुपये | प्रशासकीय मंजूरीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिपळूण | टेरव | श्री. राजेश गंगाराम कदम | २५००००/- | २५००००/- |
| २ | | खंडोत्री | श्रीम. स्मिता सिद्धार्थ मोहिते | २५००००/- | २५००००/- |
| ३ | रत्नागिरी | निवळी | श्रीम. वैयजंती सखाराम सावंत | २५००००/- | २५००००/- |
| ४ | लांजा | पडवण | श्री. भाई भिवा पडवणकर | २५००००/- | २५००००/- |
| ५ | | बुद्धवाडी त. देवधे | श्री. श्रीकांत गणाजी कांबळे | २५००००/- | २५००००/- |
| ६ | राजापूर | भालावली | श्री. अनंत यशवंत जाधव | २५००००/- | २५००००/- |

अटी व शर्ती :-

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविताना उपरोक्त वाचले क्र. ०१ मध्ये नमूद मार्गदर्शक सूचनांचे कृषी अधिकारी (विघयो) यांनी तंतोतंत पालन करावयाचे आहे.

२. उपरोक्त लाभार्थ्यांच्या सिंचन विहीरींच्या कामांना, कार्यारंभ आदेश दिलेनंतर कृषी अधिकारी (विघयो) यांनी आठ दिवसांत आखणी करुन द्यावी.

३. जे लाभार्थी सिंचन विहीरीचे खोदकाम सुरु करणार नाहीत त्या लाभार्थ्यांची निवड रदद करणेसाठी आणि प्रतिक्षा यादीवरील त्यापुढील लाभार्थ्यांची प्राधान्यक्रमानुसार निवड करणेसाठी या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावा.

४. उपरोक्त लाभार्थ्यांच्या सिंचन विहीरींच्या कामांना, कृषी अधिकारी (विघयो) यांनी दर १५ दिवसांनी भेट देऊन तांत्रिक मार्गदर्शन करावयाचे आहे.

५. सिंचन विहीरींच्या कामांची देयके हप्त्यांमध्ये पारीत करावीत. विहीरीचे काम ५० % पूर्ण झालेनंतरच पहिले देयक सादर करावे. काम पूर्णत्वाचा दाखला आणि स्थळपाहणीचा लाभार्थ्यांसोबतचा फोटो आणि मुल्यांकन दाखला सादर केलेशिवाय विहीरीच्या कामाचे शेवटच्या हप्त्याचे अनुदान देय राहणार नाही. सदर कामी प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक खर्च करु नये.

६. सिंचन विहीरींच्या काम करताना, मजूरांच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.

७. विहीरीचे काम पूर्ण झालेनंतर ७/१२ वर विहीरींची नोंद घेणेची जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची राहील. तशी नोंद केल्याचा ७/१२ उतारा लाभार्थ्यांने गटविकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे सादर करावाचा आहे.

८. कृषी अधिकारी (विघयो) यांनी दरमहा भौतिक अहवाल आणि पंचायत समितीच्या लेख्याशी जुळता आर्थिक अहवाल या कार्यालयास विहीत प्रपत्रांमध्ये सादर करावयाचा आहे.

सदरचा आदेश रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या **https://www.zpratnagiri.org/** या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक **२०२३०२१६९१०६८** असा आहे.

कृषी विकास अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत :- गटविकास अधिकारी पंचायत समिती व कृषी अधिकारी (विघयो) ......................... यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner
Scanned with CamScanner